# ऋतुकाव्य


ऋतुजा पाटील

(बी. सी. ए. 3)

देशभक्त संभाजीराव गरड महाविदयालय , मोहोळ.




**2021-22**

KAI. SAMBHAJIRAO GARAD BAHUUDDESHIY V SANSHODHAN SANSTHA, MOHOL



# DESHBHAKTA SAMBHAJIRAO GARAD MAHAVIDYALAYA , MOHOL.

## 2021-22

हिंदी विभाग संचलित

## अभिव्यक्ति क्लब

अंतर्गत

# " ऋतुकाव्य "

या कुमारी ऋतुजा पाटील या विद्यार्थिनीच्या स्वरचित कवितांचा संग्रह

**Dr. Pawar V.R.**
IQAC Co-Ordinator

**Mr. Shinde B.S.**
**Convener**
H.O.D. , Hindi Department

**Dr. Tikate D.S.**
**Principal**

| अ. क्र. | कविता | अ. क्र. | कविता |
|---|---|---|---|
| 1- | नातं | 22- | संत |
| 2- | दारिद्र्यातील सुख | 23- | जीवन मुलीचे |
| 3- | ध्यास | 24- | येत नाही ही चूक नाही |
| 4- | थांबू नका | 25- | मुठीत बळ आणि |
| 5- | मी मात्र शांत होते | 26- | भाषा माझी |
| 6- | रात्र | 27- | दीपोत्सव |
| 7- | जगण्याची आस | 28- | पाऊस |
| 8- | मन भटकत | 29- | बालपन |
| 9- | डाव रंगलाच नाही | 30- | ध्येय पूर्ति |
| 10- | दूरची हाक | 31- | तू पसरावा असा |
| 11- | आयुष्याची वाट | 32- | आठवण |
| 12- | मनातील भावना | 33- | सत्ता कोणाची? |
| 13- | तरीही | 34- | इतिहास घडवा |
| 14- | कधी असही वाटतं | 35- | अनुभव.. |
| 15- | मला माझा अधिकार द्या | 36- | पण |
| 16- | संस्कृती | 37- | स्वप्न |
| 17- | भावना | 38- | आतुरता |
| 18- | ती | 39- | माझी शाळा |
| 19— | तूच माझा मित्र | 40- | त्याला विचारायचंच राहील |
| 20- | मृगजळ | 41- | मला कवयित्री व्हायच नाही |
| 21- | निरोप घेताना | | |



# नातं

नातं तर ते नसतं,
जे उन्हात वितळून जातं

नातं तेही नसतं,
सतत सावलीसारख सोबत राहून,
अंधारात एकट सोडतं,

नातं ते नसत,
मोठ्याने बोललं की तुटून जातं

नातं तर तेही नसतं,
काचेसारखं फुटून तुकडे करतं

नातं तेही नसतं,
विजेसारखं अचानक निघून जातं

नातं ते नसतं,
माणसासारखं दुःखात एकटं सोडतं

नातं ते नसतं,
प्रेमासारखं हवं तेव्हा सोबत येतं

नातं तर ते असतं,
अश्रूसारखं दुःखात सोबत असतं..



# दारिद्र्यातील सुख

रोजच खातो कोणी पोळी तर कोणी भाकर
पण मला दयावी लागते दारिद्र्यातील उपाशीचं ढेकर

रात्री सुद्धा मिळत नाही आराम मला..
दिवसरात्र काम करतो भागवतो आम्हाला..

मिळतो की घास थकलेलं शरीर घेऊन..
काम करावे लागते तरच आमचे पोट भागते.

स्वप्न एकच पाहतो मी..
उदयाचे पोट माझे भरावे परवाच्या कार्याला शक्ती उरावे


भुक असते मला कामाची हे दारिद्र सारे संपवण्याची
आज काम केलं तरच भुक भागते उद्याची

कष्ट आज अन् मिळते उदया भाकर..
दारिद्र्यातील दुःखात आंबट साखर..

दारिद्र्य मिळालं माझ्या तर काय गुन्हा..
सुख-दुःखाच काय देवा माणूस म्हणुन जन्मच नको पुन्हा..

प्रामाणिक आहे हात माझा फारच..
मोडत नाही कामाने तो दयाळू..

एका भाकरीसाठी हे माझे  दिनवाने दुःख।
कोणास सांगु देवा दारिद्र्यातील सुख..



# "ध्यास"

जगले जीवन तुझ्यासोबत सुंदर
नको वाटते हे मोठे अंतर

एकटे असल्यावर होतो तुझा भास
तुला मिळवावा हा एकच ध्यास

फुलातही तूच दिसते
नभातही तूच दिसते

दारावरील कमान लावते तुझी आस
तुला मिळवावा हा एकच ध्यास

काही क्षणात तू दूर गेलीस
मैत्रीचं नातं तुच संपवली

आठवणही पाहते ग ऱ्हास
तुला मिळवावा हा एकच ध्यास

मिळाले लाखो मित्र-मैत्रिणी
आहेस दूर पण तूच सदामनी

कारण आहे तुझ्यात काही खास
तुला मिळवावा हा एकच ध्यास

वाद कधी झाला असेल
जीवनात तो पुन्हा नसेल


हवा होऊनी मी यावे तुझ्या आसपास
तुला मिळवावा हा एकच ध्यास

मैत्रिणी फक्त नाही होतीस बहीण
तुझ्याविना मी कसे राहीण

आठवण मनात असते तासन्तास
तुला मिळवावा हा एकच ध्यास

पुन्हा आपले यावे ग बालपण
मैत्रीत्वाने जगणे हेच आपले वचन

मैत्री आपली आहे खूप खास
तुला मिळवावा हा एकच ध्यास



## थांबू नका.....

गायक गातो म्हणून तुम्ही थांबू नका,
जीवनात जीवनगीत गात चला...
असं गावा जीवनगीत,
त्याला जग देईल संगीत....

लेखक लिहतो म्हणून तुम्ही थांबू नका,
असं काही लिहा...
मनातही साचेल आणि जग सारे नाचेल...
पतंग उंच जातो म्हणून
तुम्ही खाली राहु नका... त्याच्याबरोबर तुम्हीही उंच-उंच जावा...

जग तुम्हाला बघेल आभिमानाने,
वाटेल त्याला हेवा...
अभ्यास असा काही करा
ज्याचा जगात होईल नारा...

तुम्ही असे काही करा,
उंच आकाशी जातील नजरा...
जीवनात तुम्ही...
कसेही, काहीही करा
पण
थांबू नका... थांबू नका...

## मी मात्र शांत होते.....

आकाशाच नक्षत्र चमकत होते,
पण माझ मन अंधारात होत...

सनई चौघडे वाजत होते,
पण माझे कान ऐकत नव्हते...

विश्व विशाल समोर होते,
पण माझी दृष्टी बघत नव्हती...

वाटा अन् मार्ग हजारो होते,
पण माझे पाय स्तब्ध होते...

विचारांचा ढीग समोर होता,
पण माझ  मन एकट होत...

आनंदाचा सोहळा समोर होता,
पण माझ्यात खंत दाटली होती...

माझ्यासाठी युद्ध सुरू होते,
पण माझा पराभव अटळ होता...

लाखो समूह नाचत होता,
पण मी हताश झाले होते...

सर्वांचा शब्दवाद पेटला होता,
पण माझा शांतियज्ञ सुरू होता...

डंका सुरू होता सर्वांचा,
पण मी कोणालाच थांबवत नव्हते....

आपले आपले विचार मांडून सगळे निघून जात होते,
विषय तर माझ्या जीवनाचा होता,
मी मात्र शांत होते.......
मी मात्र शांत होते........



# रात्र

कोणी मला खूप भित
कोणी मला खूप सुख देत
माझ्यात कोणी सुंदर स्वप्न पहात
दिवसभर दमून माझ्या
काळोखात आराम करत

चिमण्या शांत झोपतात
किडे गाणी गातात
आंधाराला सजवायला
रातराणी वेलीवर पसरतात

चांदण्याचे हसू पाहून
चंद्र माझ्या काळोखात सरखतो
हळूच एकादी आई
ताण्याला झोपवताना
चादोमामाला बोलावते
चांदणी एकटी पडते

तिच्यासाठी सुंदर परी येते
रात्र अशी सुंदर असते
सूर्यामुळे मात्र ती
नाहीशी होते ,नाहीशी होते

..जगण्याची आस..

क्षण आला आहे शेवटचा
आगीतील गडद विस्तवाचा
बगीतले आहे मी सारे जग
जगण्याची आस सोसून बघ...

काही क्षणात गेला जरी जीव माझा
इतरांना मिळणार नाही सजा
बघितले सर्व माणसांचे नग
जगण्याची आस सोसून बघ.....


मुलांना माझ्या मी तयार केले
आता जरी माझे जीवन संपले
जावं तरी लागणार आहे मग
जगण्याची आस सोसून बघ....

बघून घेतले विश्व मी सुंदर
गेले ते माझ्यापासून दूरवर
जाण्याची मनात होते आहे तग-मग
जगण्याची आस सोसून बघ...

तयार आहे मी अजून जगायला
सुंदर मानुसकी डोळ्यांनी बघायला
नको हे मरण वाटतय बग
जगण्याची आस सोसून बघ....

माफ करायला अन माफी मागायला
नको वाटते मृत्यू हे अंधारात झोपायला
सुंदर जगेन संधी एकच देऊन बघ
जगण्याची आस सोसून बघ..

एके वेळी यायचाय माझ्या जागी तुला
मृत्यूमधून काढून विश्व दे तू मला
येईल बघायला तुलाही रे हे जग
जगण्याची आस सोसून बघ..



## मन भटकत...


कोणास भेटावे वाटते,
कोणास बोलावे वाटते...

माझ्या मनाला आधार
आणि अश्रूंना आवर दयावी वाटते..
थांबुनच थकलंय मन माझ
चालन्याचा विचार नाही...

स्वतःला सावरण्याचा नादात
जगण्याचे भानच नाही...
कधी एकट बसावं वाटत
स्वतःशीच बोलाव वाटत...

चुका काढायला मात्र
दुसरे कोणीच सोमोर नसत...
माझ्या जगात आज मला
फार एकट वाटत...

जावं कुठे याच्या शोधात
मन सगळीकडे भटकत...
मन सगळीकडे भटकत....



## डाव रंगलाच नाही....

मांडला होता डाव मी खेळतही होते,
जीवनाच्या वाटेवर मग्न होऊन जगत होते
मांडलेला रंगत नव्हता,
रंगलेला डाव कोणास आवडतही नव्हता....

मी जीवनाचे फार रंग बदलले
पण माझा रंग उमटलाच नाही,
मांडलेला डाव कधी रंगलाच नाही.....
जीवनातील खेळ मला मांडायचे होते,
मांडलेले खेळ रंगवायचे होते,
दुःखाच्या संगतीने हाती काहीच नव्हते...
माझे स्वप्न मलाच दिसत नव्हते...

रंग बदलुन डाव मांडला तरी
दुःखाचे डाव होतेच की हिरमुसणारे,
सुखाचे मात्र न सापडणारे...
राहिलेच नाहीत ते स्वप्नांचे डाव माझ्याजवळ....
कारण,
त्यात मी जिंकणार होते,
ज्या खेळात मी तरबेज होते,
ते माझ्या जिवनात रंगलेच नव्हते....
नाती गोती जपण्यासाठी जे डाव मी मांडले होते....
ते डाव कधी रंगलेच नव्हते .....
ते डाव कधी रंगलेच नव्हते .....



## दूरची हाक

फक्त एकदा तुझ्यासाठी हसायचायं,
सुंदर गीत गात राहायचायं...
मनात तुझ्या घर करायचायं
तुझ्या हृदयात मला जगायचायं
थांबायचायं तुला बघत
तुझे कौतुक सर्वांना सांगत...

करायचायं तुझा मला आदर ठेवायचीय सदा तुझी कदर...
सोडायचं नाही आता तुला जगायचायं तुझ्यासाठी मला...
माघारी येऊन मिठीत घ्यायचायं तुला,
आनंदाचा सागर दयायचायं तुला...
खुप केलंस तु माझ्यासाठी काय काय
आठवेण सतत पण विसरणार नाय
तु जे दिलंस ते घेऊन मी जगेन,
पंख नसले तरी आकाशात तुला घेऊन उडेन...
दूर दूर असेल मी जरी
मीच तर आहे तूझी परी
येईन जवळ काही क्षणात
आयुष्यभर राहीन तुझ्या मनात...

जन्मच नाही,तू दिले मला जग
दूर आहे ग मी आठऊनग बघ...
जन्मदात्री आहेस, तु माझी माई
कशाची उपमा देऊ ग तुला मी आई...
दूर आले मी नको करू काळाजी
आई आहेस तु फक्त माझी.....



आयुष्याची वाट...

आयुष्याची वाट खुप मोठी आहे,
ती संपणे म्हणजे आयुष्याचा शेवट आहे...

वाटा तर खुप खुप असतात,
त्यात अपघाताची चाहुल आहे...
आपघात झालाच तरी बरे होणे कठीण आहे,
झालेल्या जखमेला मलम मिळणे अशक्य आहे...
जखम झालीच समज बरी,
पुढे त्याच वाटेचा प्रवास आहे...
आयुष्य तुझे केवढे आहे,
त्याची तर नोंदच नाही...
सर्वात सोपा मार्ग तुझा मला माहित आहे,
तुझ्यातील धाडस बाहेर येणे गरजेचे आहे...
आनंदाचा स्वर्ग अन्
यशाचा मार्ग तुला मिळणार आहे...
हिच तर आयुष्याची वाट आहे...



....मनातील भावना....

भावना सांगते हसायला
तीच सांगते रडायला
भावना माझी,
भेट घालते तुझ्याशी,
माझी भावना सुंदर असते...
मी न बोलता सगळं सांगून टाकते.....

आई-वडीलांना तर
ती लगेच समजते
तीच तर भावना असते....
माझ्या आणि आपल्या
मनावर परिणाम करते
सुख दुःखात पाठीशी असते
माझी भुक अन माझी
सदा ती तहान असते...

मनात तर ती सतत असतेच
पण
कधीच ती समोर नसते,
म्हणुन भावना नाही समजल्या
जग मात्र फसते....
जग मात्र फसते.....



"तरीही..."

गुलाबासारखे जरी जगले
सुख सगळे आपणच भोगले
श्रीमंतीत सर्व जीवन गेले
सौभाग्य सारे आपल्यालाच मिळाले
तरीही...... होणारं आहे शेवट

अमृत पेले जरी गंगेचे
जीवन जगले वेगळ्याच रंगाचे
नात जरी टीकवलं सुंदर संघाचे
जिंकून घेतले शस्त्र जगाचे
तरीही...... होणारं आहे शेवट

सूर्य नाही जरी उगवला
नियम जरी त्याने मोडला
प्रकाश त्याचा त्याने मोडला
सूर्यास्त जरी उत्तरेकडे झाला
तरीही...... होणारं आहे शेवट



कधी असही वाटतं

कधी असही वाटतं
मी पक्षी असावं उंच झाडावर बसावं....

कधी असही वाटतं
मी फुल असावं ईश्वर चरणी वसावं.....

कधी असही वाटतं
मी थंड वारा असावं सगळीकडे पसारावं.....

कधी असही वाटतं
मी प्रकाश असावं तिमिराला तेज द्यावं.....

कधी असही वाटतं
मी पाणी असावं समुद्रात असून डोळ्यातही असावं.....

कधी असही वाटतं
मी विचार असावं सर्वांच्या मुखात राहावं......

कधी असही वाटतं
मी सुगंध असावं सगळीकडे पसरावं.......

कधी असही वाटतं
मी भावना असावं प्रत्येकाच्या मनात बसावं......

पण शेवटी-शेवटी इतकंच वाटतं
सुख दुःखात साथ देणारे
मी फक्त अन् फक्त अश्रू असावं.....



मला माझा अधिकार द्या

मला माझ्या जीवनाचा फक्त
अधिकार द्या....

काय करायचं आहे मला त्याचा
विचार करू द्या..

माझे मोठे निर्णय कृपया
मला घेऊ द्या..

जे हवंय त्याचा मला विचार
करू द्या...

जे नको ते मला मिळवून
देऊ नका..

माहीत आहे मला
माझी काळजी आहे तुम्हाला

काळजीच्या आमिषाने मला फसवू
मात्र नका..

जबरदस्तीने मला कोणाचीही
बनवू नका..

जगण्याचा आस्वाद माझा लांब
नेऊ नका..

कदाचित माझा निर्णय चुकीचा
असला तरी..

मला आनंदाने दुःख माझे
पचवू द्या...

जन्मांतरीचे नाते फार अतुट
जरी असतील..

तरी माझे जगणे माझ्या नात्याने
जगू द्या..

मला जे हवे ते एकदाच
मिळू द्या..

तुमच्या चालीरीतीच्या थोडे पुढेही
जाऊ द्या...

मला माझी माणसं माझ्या डोळ्यांनी
बघू द्या..

मृत्यूच्या पुढील जगण्याची सुंदर
कमान बघू द्या..

मला माझ्या जीवनाचा फक्त
अधिकार द्या.....



## ...संस्कृती

सांगते माझी संस्कृती
पितृ देवो भव मानीती
त्यांची किंमत लोक जाणती
असे सांगते माझी संस्कृती...

मातेलाच आज लावतात झुडकारूनी
उगच समजतात मातीला जननी
मातृ देवो भव आज प्रत्येकजण विसरती
असे सांगते माझी संस्कृती...

उच्च निच मानतात तेच
उगीच लावून घेतात पेच
धर्मात माझ्या भव्य अतिथी
असे सांगते माझी संस्कृती...

राम होता पुत्र कौशल्लेचा
जयजयकार होतो तिच्या संस्काराचा
संपुन गेली ती संस्कारी स्थिती
असे सांगते माझी संस्कृती...

पांडवांचे झाले होते महाभारत
रामायण रामाचे होते घडत
होती जणू संस्कारी ती वृत्ती
असे सांगते माझी संस्कृती...

अंत झाला आहे त्या संस्कृतीचा
आज विचार होतो व्यर्थ कृतीचा
ज्ञान देऊनी जाते ती पोथी
असे सांगते माझी संस्कृती...



**भावना....**

भावना नावाच्या राज्यात गेले....
खूप गोंधळ ऐकून,जरा पुढे गेले
आवाज वाढतच होता....

शांती म्हणत होती "मी आहे म्हणून जग चाललयं...."
समाधान म्हणत होता " माझ्यामुळे तुला जगाने ओळखलयं"
राग म्हणला "मी माझ्या मुळे तर माणसात बदल होतोय"
सुख म्हणाला "माझ्यासाठी तर माणूस जगतोय"
दुःख म्हणालं "मी आहे म्हणून माणूस नीट वागतोय"
लोभ म्हणाला " माझ्यामुळे तर माणूस पुढे पळतोय"
मला विचार आला, इथे तर भावना भावना भांडतीय......
तर तिथे माणूस भांडतोय.....
मी जरा आत गेले.....
सगळे माझे माझे म्हणून भांडत होते......
अहो, एक कोपरा उदास होता....
एकटा एकटा पडला होता....
मी गेले तर चटकन हलला होता....
जरा शांत बसून मला म्हणाला," मी तर सगळीकडे असतो......पण कुठेच नसतो.....
रामायणात होतो ग,
महाभारतात होतो, आता आज इथे पण आहे अन् तीथे सुद्धा आहे...... "
मी आहे म्हणून माणूस घरात तरी आहे......
हे सगळे नसले तरी मी तुम्हाला हवा आहे....
माणूस माझा नीट वापर करेना...
माझ्याशिवाय कोणी नीट जगेना....
दया येते माणसाची माझ कोण ऐकना...
मी नसतो तर आज प्रत्येक घर कोर्टात असत....
मी नसतो तर दोन भाऊ एका घरात नसते...
मी नसतो तर आई बाबा समजले नसते...
मी नसतो तर माणसात माणूस नसता...
मी नसतो तर राधा कृष्ण समजले नसते...
मी नसतो तर आज भाऊबीज नसती...
मी नसतो तर लैला समजली नसती ना मजनू...
मी नसतो तर जगात माणूस सुद्धा जानवर असता....."
मी पटकन उठेले विचारलं तू आहेस तरी कोण.....?
तो म्हणाला "मी उच्च भावना या जगातील....
पण भीती आहे एक माझ्या मनातील.....
संपून जातोय जनातील......
अग मी तर प्रेम तुमच्या मनातील......
अग मी तर प्रेम तुमच्या मनातील......



**ती.......**

प्रेमाने बघते ,सुंदर लागते
नवीन नसून नव्यासारखी सजते

ती फार सुंदर दिसते
मी बघितली की गालात हसते

ती रात्रंदिवस माझ्यासाठी उभीच असते
नाही मी बघितले की ती मात्र रुसते

सौंदर्य तिचे खूप छान असते
मलाच नाही ती देवालाही आवडते

तीचे जे काम असते तेच करते
ते म्हणजे समोरच्याला आपल्या प्रेमात पाडते

ती फक्त सुंदर जागीच असते
कारण तशी नाजूक असते

प्रेयसीच्या हातातही सुंदर दिसते
प्रेमाच्या हृदयात कायम राहते

माझी ती जवळची वाटते
कारण ती मला सारखीच बघते


तू तिला नाही काही दिला जरी
सुख शांती सतत देते ती

शब्दांनी नाही काही सांगत
डोळ्यांनी सतत राहते बोलत

प्रेम करते ती फार आपल्यावर
आठवण काढते मी झोपल्यावर

मी तिच्या जरा जवळ गेली
ती फार सुंदर हसली

ती तर होती "गुलाबाची कळी"
कोमल स्पर्शी ,राहते हृदयी.



"तूच माझा मित्र"

खुणावतात लोक मला
यश माझ्या जवळ असताना
दूर जातात माझ्यापासून
एकटेपणाने मी फसताना

हवा आहे मला आधार तुझा
एकटेपणातील मला हवी रजा
एक नाही मैत्रिणी आहे दोन-तीन
वार करतात त्याच माझ्या पाठीमागून
सुगंध उठलाय समूहीकथतेचा
विटत चाललाय वास माझ्या एकटेपणाचा
राग येते मला असे जगताना

पण आनंद वाटते माणसे तुझ्यासारखी मिळवताना
हसले कोणी माझ्या निर्णयाला
सलाम करतात माझ्या निर्धाराला
एकटेच रे मी पडले आहे
माझ्यात दुःख फार दडले आहे
माझे विचारही सडले आहे

अरे मित्रा,
क्षणा-क्षणाला तुझ्या आठवणीने
मी मात्र रडले आहे
कारण तुझ्याविना मी मात्र एकटीच पडले आहे




**मृगजळ....**

तुझ्यासाठी जगते आहे.....
तू पुढे पुढे मी मागे पळते आहे....
तुझा क्षनिक मुक्काम असतो
मी दिवस रात्र फिरते आहे....

तुझ्यासाठी नाती संपतात, माणुसकी संपते.....
तुला आमची नाही आम्हाला तूझी गरज असते......
नावे तूझी लक्ष्मी, संपत्ती, धन.....

तुझ्यासाठी राहत नाही माणसात माणसाचं मन......
जगवशील लाख तू आम्हाला पण वैरसाधशिल सुद्धा......
लाख जन जगून मेले अजून संपला नाही तुझा मुद्धा.....
भले भले गेले की रे तुझ्यासाठी झीजून,

तू सुखी आहे ऐश्वर्यावर निजून.....
माणूस मरतो आहे जगतो आहे......
पण उठून तुझ्याच मागे पळतो आहे.......
बस कर आता जरा थांब विसावा घे......
माणसांच्या गर्दीत जरा आराम घे.......
काही नाही रे समाधान मिळवायला लागतं
माणूस,तू सुखी होऊ देईना......
तुझ्या नादात आम्हाला झोप सुद्धा येईना........



निरोप घेताना

जा पाखरा, तु गगनी जा
स्वप्नासाठी फार उंच जा
सोडून जाशिल आम्हाला
पण विसरू नको आपल्या आठवणीला......

दुख होते तुला निरोप देताना
पण अभिमान वाटतो तु पुढे जाताना
दुर आज जाणार आहेस प्रयत्नातून यश घेणार आहेस
स्वप्ने फार मोठी असु दे
कष्ट तुजे अम्हाला दिसू दे
विसरू नको तु येथील भावना
आठवण सदैव असु दे मना.....

तुझा पतंग उंच असू दे
गर्व जवळ तुझ्या नसु दे.
निरोप घेतला तरी
विसरु नको अश्रूंना कधी साठवु नको
नाती मिळतील रोज वेगळी नसतील तुझीच सगळी
माणसे मिळवं गमउ नकोस
कष्टांना कधी विसरू नकोस....

आज प्रयत्नांना येऊ दे बहर
उद्या तु त्यातच विहार.....
निरोप झाला, पण समज झाला शुभेच्छा समारंभ
आज पासुन कर तु
नवा आरंभ, सुखाचा प्रारंभ......



झाले संत साधू आणि महात्मा
तयार केला त्यांनी सुंदर आत्मा

पाहून त्यांची कीर्ती
जागी होते आपलीच स्फूर्ती

आजच्या युगात विचार नाही त्यांचा
विचार केला जातो पैसा आणि
स्वार्थाचा


तुकाराम होते होत्या जनाबाई
त्यांची मंदिरे दूरच आज राही

अभंग होते होत्या ओव्या सुंदर
चित्रपटाच्या जगात त्यांना पडले
आंतर

भक्ती होती त्यांची देवसाठी
आज भरती आहे पोटासाठी

मुखातील शब्द हवे होते देवांना
संत आणि देव हवे होते सर्वांना

विचार करू कलियुग बदलू
संत तर होऊच पण
विठ्ठलाचा भक्तही होऊ



# "जीवन मुलीचे....!"

मुलगी बनून जगू की जीवन भोगू
दुःख माझे कोणाला सांगू
आरक्षण दिले सांगतात थाटाने
माझ्यात घरात मरतात काट्याने.....

मुलगी रहा जरा जपून
सागतात असे खूप जण
तेच सांगतात मला
काम कर जरा खपून.....

दिसत नाही कष्ट माझे कुणाला
विचारते मी माझ्याच मनाला
त्रास झाला म्हणून सांगताना
मला सांगतात अहील्या आणि
सवित्रीना.....

हाकेला माझ्या नाही येत
जगते जीवन दुःख सोसत
"चूल आणि मुल" नाही आता
त्यातून सुटका नाही माझीच
आता....

संसार करते सांगते पण
सहार झेलत हे कोण विचारते
पुरुप्रधान पुढे असेते मान खाली
स्त्री प्रधान संस्कृती का नाही
आली.......

चीमटभर पैसे नसतात जवळ
माझ्या
मुटभर नोटा कशाला जवळ तुझ्या
पन्नास टक्के आरक्षण नको मला
मान पाण सुध्दा राहुदे तुला....

एक हाकेला ये माझ्या
विचार काय हवे नको मला
जन्म माझा अर्पण तुला
पुरुषप्रधाना फक्त तुला....




येत नाही ही चूक नाही
प्रयत्न खचतात आपलेच काही...

माणसाला खुप काही येत
तयारी प्रयत्नाची त्याच्यात नाही...

जमते सगळे फक्त माणसाला
करण्याची जिद्द त्याचात नाही...

प्रत्येकाच्या कष्टाला मोजता येत
नाही
कष्ट केले की यश लांब राहत नाही..

## येत नाही ही चूक नाही...

समजून कार्यरत राहणे हे काम आहे
कार्याचा साठवूनी साठा
त्याचा काही उपयोग नाही .....

क्षणीक एका प्रसंगाने शिकतो
काही
प्रयत्नाचा झरा आपल्याला नाही...

थोडया कष्टासाठी यश मागे राही
येत नाही ही चूक नाही...

चुकूनही शिकण्याचे ध्येय ठेवतो
तो यशाच्या शिखरावर राही...

## येत नाही ही चूक नाही....



# "....मुठीत बळ अन्...."

स्वप्न पाहून त्यापलीकडे
जाण्यासाठी....
मनातील सर्व सत्यात
दाखवण्यासाठी....
कल्पना करून नवा शोध
घेण्यासाठी.....
मेहनत करून जास्त यश
प्राप्तीसाठी.....
रक्त सांडून आयुष्यात
मार्ग जिंकण्यासाठी....
प्रयत्नाच्या रस्त्यात
यश सोडण्यासाठी.....
अपयशाच्या नगरीत
यश देण्यासाठी.....
दुर्गण काढून सदगुणांच्या
आंगिकारासाठी.....
अन्यायाला तोडून
न्याय राखण्यासाठी....
विचारांच्या वादळातून
देह प्राप्तीसाठी.....
हे सर्व करण्यासाठी....
मुठीत बळ आणि
मनात
फार मोठ स्वप्न लागत.....




# "भाषा माझी "

मी मराठी ,आम्ही मराठी
आमच्या ज्ञानातही, मनात मराठी
सन्मान करतो तिचा
अभिमान आम्हाला जीचा
जगतो आम्ही जिच्यासाठी
तीच मराठी, आम्ही मराठी....

जरी आला आहे संगणक
असला जरी आज मोबाईल
गरजू तिच्याच ,आम्ही असू तिच्यात
झाला जरी बदल तुमच्यासाठी
असाल बोलत भाषा परकी तरी
आहोत आम्ही मराठी.....

जिने शिकवले अलंकार
जिच्यात आहे व्याकरण
ग्रंथातही तिच्याच एक प्रकार
जन्म आमचा त्यातच अन मरण
खेळतो जीच्यात ,बोलतो मराठी
तीच एक आमची मराठी....

नाही नव्हता कोणी हिला चालक
मराठी आमचीच अन् आम्हीच तिचे
मालक
आहे आम्हाला परक्या भाषेचा
तिरस्कार
म्हणूनच करतो आम्ही मराठीचा
पुरस्कार
विचार करतो जिच्यात, तिच्यासाठी
आम्ही आहोत आणि असतो मराठी
आम्ही मराठी ,माय मराठी......!



# !...."दिपोत्सव"....!

दिव्या दिव्याची असते आरास
त्यात असते काही खास
ज्योती चा असतो त्यात सहवास
असतात त्या सुंदर आणि खास.....

दिवा लागते जेंव्हा दारी
प्रकाश येतो आपल्या आंगणी
एक किरण येतो जेंव्हा नाजरी
दिव्यांचा दिपवोस्त्व होतो
घरोघरी.....

तेल आणि वातीच नात असत
त्यातील एकजण नसेल की सगळे
संपते
जगात दोघे एकाच पणतीत
संपून जातात एकाच रात्रीत.....

गर्व नसतो तेल आणि वातीला
असतात ते एकमेकांच्या साथीला
लहान असते ती सुंदर पणती
दिवा म्हणूनही तीच उजळते....

दूरवरून तिला बघितले की
लखलख करत हसते ती
आधार नको वाटतो तिला
सूर्य नसला तरीही चालते तिला.....

उजळते आणि उजळवते
कवते घेते दिशाही दाही
तीच्यचामुळे झाली आज
नवनिर्मिती
दिवा आरतीही आणि तीच
पणती....




धरती भिजवतो
तिला ओलीचिंब करतो
आपल्या थेबानीं तिला साजवतो
तो पाऊस असतो....

हिरवा सौंदर्याने
नटवतो पृथ्वीला
शेतकऱ्यांचे सुख तो असतो
तो पाऊस असतो...

माळरानाचे रंग आणि रूप बदलतो
लोकांचे सुख सादतो
निसर्ग सारा बदलतो
तो पाऊस असतो....

समृद्ध असतो
रंग मात्र त्याला नसतो
स्वच्छ आणि सुंदर असतो
तो तर पाऊस असतो....

थेंब- थेंब असून
तो सागरही असतो
सुंदर फुलांचा तो बहर असतो
तो पाऊस असतो....

गीत असतो
आवाजही तोच असतो
मंगल आणि पवित्र असतो
जगवतो- मारतो....

रात्री सुध्दा बरसतो
दिवसाही येतो
सर्वत्र पसरतो
तो पाऊस असतो...



# "...बालपण..."

शब्द नसतात आपल्याला फुटत
आपलेच कोडे नसते आपल्याला
सुटत
कशाचेही नसते जेंव्हा शहाणपण
तेच आपले भोळे बालपण
रडणे ,हसणे हाच दिनक्रम
कसेही राहतो तोच विक्रम
मनात आपल्या होते सगळे सहन
तेच आपले भोळे बालपण
आपले कोण अन् कोण परका
नसते जेंव्हा आपल्याला माहीत
प्रत्येक वेळी असते आपल्यात
खरेपण
तेच आपले भोळे बालपण
कोठेही जातो नुसते रांगत
मुके असून खूप बोलत
असतो आपण सर्वांसाठी छान
तेच आपले भोळे बालपण
खेळणी घेतो त्यांना मोडतो
मोडून सारे नव्याने जोडतो
लाहन असून असतो महान
तेच आपले भोळे बालपण
माती आणि पाण्याचा करतो खेळ
काय करतो याचा नसतो मेळ
आई समोर जगतो थाटाने आपण
तेच आपले भोळे बालपण
सुख दुःख जेंव्हा  नसते माहीत
आईचं जपते आपले हित
हवे तसे राहतो  ते एकच जीवन
तेच आपले भोळे बालपण......

...बालपण...





मला माझ ध्येय हवय
त्यासाठी फार चालायचं आहे
कष्टाचा शोध घेऊन
ध्येपूर्तीकडे चालायचं आहे....

विचार कष्ट , कष्टाचे विचार
तयार त्यासाठी मी आहे साकार
प्रयत्नाचा झरा घेऊन
ध्येयपुर्तीकडे चालायचं आहे...

मनातील इच्छा सर्व
त्याला आणून अस्तित्वाचा पर्व
त्याच्या पुर्णत्वासाठी
ध्येपूर्तीकडे चालायचं आहे...

झोपित स्वप्न न पाहता
सत्यात ते पहायचे आहे
स्वप्नाच्या पूर्णतेसाठी
ध्येपूर्तीकडे चालायचं आहे....

जिंकले जरी आणि हारले तरी
मरेपर्यंत सुंदरपणे टिकायचे आहे
मन करुनी निर्मळ
ध्येपूर्तीकडे चालायचं आहे....



# "तू पसरावा असा....!"

तुझा प्रचार करले विश्व सारे
जगावे तू माणुसकीचे किनारे
श्रीमंतीच्या पैशात रहा जरा
गरिबांचा उचल भार सारा
माणुसकीच्या मनात घर कर
बाण तुझा भ्रष्ट वर धर
फुले नाचतील तुझ्या संगतीत
पक्षी राहतील तुझ्या गाण्यात
मनोगत बन तू मुक्या प्राण्यांचे
विचार कर तू त्यांचा राहण्याचे
मांड तूच रे त्यांचा यज्ञ
तयार कर नागरिक सुज्ञ
मातीत असून ती पाण्यात असावे
समुद्रात असून नदीत उतरावे
गरिबांचे कष्ट न होता
यश तू त्यांचे असावे.......
जग जीवन आहे तू  जसाच्या तसा
पर्यंत करून बन त्यांचा वारसा
मनात सर्वांचा असावा तू असा
मुक्यांचे गीत होऊन गावा सुंदर
असा
की.......तू पसरावा असा.....!


पसरावा असा....!"

## आठवण

जवळ माणूस नसला तरी चालेल
आठवण मनात असली पाहिजे,
सुंदरता जवळ नसली तरी चालेल,
समजूतदारपणा असला पाहिजे
आनंदाश्रू जवळ नसले तरी चालेल
स्मित हास्य जवळ असले पाहिजे
नाती नावाची नसली तरी चालेल
नात्यावरच प्रेम असलं पाहिजे
प्रेमाची भूक नसली तरी चालेल
त्याची ओढ नक्कीच पाहिजे.
मनात भावना नसली तरी चालेल
चेहऱ्यावर गोडवी असली पाहिजे
जीव नाही दिला तरी चालेल
काहीसा वेळ दिला तरी चालेल
प्रकाशाचे स्तंभ नसले तरी चालेल
इवलीशी पणती असली पाहिजे
आपुलकीचा सागर नसला तरी चालेल
मायेचा पाझर असला पाहिजे
रोजची भेट नसली तरी चालेल
गोड संवाद असला पाहिजे
मदत प्रत्येक वेळी नसली तरी चालेल
त्या सुखद शुभेच्छा असल्या पाहिजेत
मला नाही स्वीकारले तरी चालेल
माझे विचार तरी ऐकले पाहिजे,
माझे विचार तरी ऐकले पाहिजे.

**सत्ता कोणाची???**

सत्ता करतात लढतात राजकारण
बदलणारे मंत्रिमंडळ जनतेच त्यात मरण,,,,,,
स्पर्धा लागली आहे त्यांचीच एकमेकांत,,
जनता जाते वाहून गोंधळाच्या पुरात,,,
एका आश्वासनाने भुलवतात जनतेला,,,
खुर्ची मिळाली की लागतात सत्तेला ,,,
नाही करत ते कोणाचचं कल्याण ,,
मृत्यु आणते जनतेला राजकारण,,,
होतात मंत्री वेगवेगळ्या जागाचे,,,
बदलतात तरी ते किती वेळा,,
त्यांच्या मुळे जनतेला झोप ना डोळा,,,
देशात नीट नाहीत ना रस्ते,,
प्रवासात जनता खाते कस्ते,,,
रेल्वे मंत्री वेगळा,, खात त्याचं वेगळं,,
एका फेरीसाठी रेल्वेच्या जनतेला करत मोकळं,,,
पुरेल का त्यांना काळा पैसा हो,,,
सरकारी नेत्यांना मिळेल का सगळा हो,,,
जगतात पुढारी गरिबांच्या समोर,,,
नेत्यांसाठी आज गरीबच चोर,,,,,
मंत्र्याच्या स्वप्नात आला जरी निर्णय एकदा
तरी समाजात सांगतात ते दोनदा,,,
जीव जाण्याची वेळ येते ज्यांच्यावर सारखी,,
मंत्र्यांचे आश्वासन पूर्ण व्हावं, यासाठी असते गिरखी,,
आणि शेवटी तो गरीब म्हणतो
नक्की सत्ता कोणाची??
नक्की सत्ता कोणाची??



## इतिहास घडवा

उदात्त, उत्कट आणि उत्त्युंग
महत्त्वकांक्षा उराशी धरा
आणि ती पुरी होण्यासाठी कठिण परिश्रम करा.....
कारण वेडी माणसेच इतिहास घडवतात
आणि एक नवा इतिहास निर्माण होतो
रक्ताच्या आणि घामाच्या थेंबातुनच....
अत्तराच्या वा गुलाब पाण्याच्या थेंबातून नव्हे....
इतिहास आपण वाचला
पण पुढील पिढीला इतिहास घडवा....
यासाठी अविश्रांत कष्ट आणि
नवनिर्मिती हा यज्ञ
हेच आपले एकाग्र अनुष्ठान असावे....



**अनुभव..**

रात्री अंधारात एकटीच होते
उजेड जरा आडोशाला गेला होता
झाडाजवळ मी बसले होते
रातकिडे ही झोपले होते
आवाज कशाचाहि नव्हता
अंधार पसरला होता
झाडाची पाने झोपी गेली
मी मात्र जास्त घाबरली
डोळे उघडे असून
दिसेना मला काही
विचार केला गेल्या
दिशा कुठे दाही
अशा काळोखात एक
व्यक्ती आली
जी माझ्यासारखीच
होती चुकली
तेव्हाच कळून मला चुकलं
माझ्यासारखं जीवन देवाने
आणखी कोणाला दिल
अनुभवाने मन माझं समृद्ध झालं

**पण.....!**

जीवन प्रवासात कोणी भेटते
चार अनुभव देते
मग ती आपलीशी वाटते
काही क्षणात निघून जाते
पण, आठवण कायमची राहते

कांहीस शिकवून जाते
ज्ञानही देऊन बघते
क्षणभर हसवुन-रडवून जाते
पण, आठवण कायमची राहते

ती आपली कोणीच नसते...
तीच व्यक्ती आपलं सर्वस्व बनते
आयुष्यभर नसते की ती
जेवढा वेळ ती असते.....
तेवढेच खरे आयुष्य असते
जीवनाचा आदर्श बनून निघून जाते
पण, आठवण कायमची राहते

मोजके शब्द ते अगदी
काहीच वेळ असतात
पुन्हा- पुन्हा ऐकावे अन्
कानी पडावे वाटतात
अशा मनाला लावून निघून जातात
पण, आठवण कायमची राहते

तो प्रवास सुंदर असतो
मन हलके हलके झाले होते
आता आठवते दिवस मागचे
पण, आठवण कायमची राहते.......

**स्वप्न...**

स्वप्नात कोणी भेटून जातं
नकळत काही सांगून जातं
जे हवं ते स्वप्नात मिळत
जे नको ते सत्यात मिळतं
जिंकण्याच्या अनुभव स्वप्नात मिळतो
अपयश मात्र अस्तित्वात असतो
दूरच्या गोष्टी जवळ येतात
त्यावर स्वप्नात असतात
जवळच्या गोष्टी लांब जातात
ज्या हव्या असून मिळत नसतात
स्वप्नात काही असंच येतं
मनाला तृप्त करून जातो
तेच डोळ्याने पाहायला
डोळे उघडले की....
सगळेच मात्र संपून जातं
जे झोपेत पाहिलं व
डोळ्याने कधीच न दिसल्याने
ते स्वप्नच असतं....

आतुरता....


भूक आहे तुझा प्रेमाची
तू तर मिळतच नाही
माझ्याशिवाय तुझी किंमत
कोणाला कळतच नाही

तू पुढे मी मागे संपवू हा खेळ
तुझ्या माझ्या प्रीतीचा  होणार कधी मेळ
अकांत ओरडतो आहे जीव माझा
मात्र तुला फक्त विचार तुझा

एकटी पडेल आहे मी तुझ्याविणा
का अंत पाहतो दूर जाऊनिया
बंधनात अडकले मी भावनाच्या
तू अडकूनिया बसला समाजाच्या

विसरता येत नाही तुला
यात माझा काय गुन्हा
काय म्हणून विसरावं
आहे का आयुष्य पुन्हा
क्षणभंगून येऊन गेलास तु

आठवण येत आहे
तु कोणासाठी माहित नाही
मी तुझ्यासाठी जगते आहे



## माझी शाळा

माझी शाळा आहे....
माझ्या भविष्याचा फळा
ती माझ्या फुलांच्या माळा
मी तीच्यासाठी गुलाबाच्या कळ्या....
उमलायच्या आधीच शिकवते जगायला
ती आहे म्हणुन आम्ही जातो घडायला
गुरूंचा आहे मला आशिर्वाद
म्हणून मी जगते निर्विवाद....
शाळेतील वेली, फुले झाडे
आहेत माझ्या जीवनाचे पाढे
शाळेतील प्रत्येक वर्ग
आहे माझ्या जिवंतपणाचा स्वर्ग...
शाळेचे ते मोकळे मैदान
आम्हाला देतो सुंदर अभिमान
शाळेच्या कार्यक्रमाचे मंच
माझ्या जीवनातील प्रगतीचे संच....
इथे येतो मनात नवा ध्यास.....
म्हणून करतो शाळेत अभ्यास.....

**त्याला विचारायचंच राहील....**

जेंव्हा पाहिलं त्याला
होकार गृहितच धरला
मी तुला आवडले का?
त्याला विचारायचंच राहील..

सप्तपदीच्या वर्तुळात
त्याच्या मागे मागे गेले...
कुठे घेऊन जात आहेस?
त्याला विचारायचंच राहील....

माप ओलांडून आत गेले
त्याच्याकडे पाहून इथे
सगळे आपलेच होतील का?
त्याला विचारायचंच राहील....

मनात मे तुझीच झाले होते
तो गप्पच उभा होता
तुलाही मी हवी आहे का?
त्याला विचारायचंच राहील....

गरोदरपणात माझ तस
खूप कौतुक झालं
त्या गोड गोड शब्दाची
तुलाही गरज आहे का?
त्याला विचारायचंच राहील....

बाप म्हणून जगताना
मुलांनी खुप अपेक्षा केल्या
त्या कसरतीसाठी.....
माझीपण गरज लागेल का?
त्याला विचारायचंच राहील....

न मागता सगळच देतो
मी हसत हसत घेते
तुलाही काही देऊ का?
त्याला विचारायचंच राहील....

नात्यांमध्ये माझे सगळे
लाड कौतुक होते
तो शब्दवर्षाव तुला हवा का?
त्याला विचारायचंच राहील....

## *मला कवीयत्री व्हायचं नाही*

मला कवीयत्री व्हायचं नाही...
होण्याचा विचार मनातच नाही...
मी कुसुमाग्रजांचा वारसा नाही,
जे वाटल, टोचल, बोचल, खुपल
ते मी फक्त लिहल
तुम्ही ते वाचलच पाहिजे,
अशी माझी आशाही नाही...
मला कवीयत्री व्हायचं नाही...

निसर्ग, समाज, नाती
शब्दात बांधून....
ते मला मांडायचे होते.
माझही तेच जे तुमच्या आहे मनात
शब्दात मांडल अन् लीहल वहीच्या पानात...
जे मी लिहल आहे तेच पूर्णसत्य आहे ...
अस मला सांगायचं नाही...
मला कवीयत्री व्हायचं नाही...

मनात कोणाच्या मला युद्ध सुरू करायचं नाही...
कोणाच्या भावना मला दुखवायच्या नाही...
पण सगळ्यावर माज मत मला लिहायचं आहे...
त्यावर तुमचं मत विचारायचं नाही...
मला कवीयत्री व्हायचं नाही...

मी जे लिहील ते काय सुवर्णक्षर नाही...
पण यातल्या (ऋतुकाव्य) एका तरी विचाराने...
पुढल्या हजारों पिढीतील किमान एकान...
त्याच्या हृदयाच्या एका कोपऱ्यात
एखादी जाणिवेची भवणा आली...
तर माझा आत्मा वर शांत होईल...
जस मी लिहाल आहे तसच झालं पाहिजे अन्
तुम्ही तसच जगल पाहिजे असा माझा अठाहास
नाही....
मला कवीयत्री व्हायचं नाही....
मला कवीयत्री व्हायचं नाही....